महत्वाचे / तातडीचे


**पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण, यांचे कार्यालय,**
चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे - 411 008
दुरध्वनी क्रमांक 020-25657878 फॅक्स क्र. 020-256746
ई मेल - sp.pune.r @maha.gov.in


जा.क्र.नोंशा/प्रबंधक/सी.सी.टी.एन.एस./ई-निविदा-2023-24/ /2023 पुणे, दि. / /2023

## ई-निविदा सूचना

**विषय**:- पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण कार्यालय व त्यांचे अधिनस्त शाखा, अपर पोलीस अधीक्षक कार्यालये, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय व पोलीस स्टेशन मधील सी.सी.टी.एन.एस. प्रणाली साठी वापरण्यात येणारे संगणक व प्रिंटर्स करीता सर्व समावेशक वार्षिक देखभाल व दुरुस्ती करार (Comprehensive AMC) करण्यासाठी ई- निविदा मागविणेबाबत.

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण हे महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्यांचे कार्यालय व त्यांचे अधिपत्याखालील सर्व शाखा त्यांचे कार्यक्षेत्रातील खाली नमूद केलेल्या कार्यालयामध्ये सी.सी.टी.एन.एस. प्रणालीसाठी वापरण्यात येणारे एकूण 96 नग संगणक व (Single Function - 2 Nos. & multifunction - 22 Nos.) अशा एकूण 24 नग प्रिंटर करीताचे सर्वसमावेशक (Comprehensive AMC) वार्षिक देखभाल व दुरुस्ती करार करण्यासाठी दोन लिफाफा ई-निविदा पध्दतीने खाली विहीत केलेल्या अटी व शर्तीना अधीन राहून नोंदणीकृत व मान्यताप्राप्त व्यावसायिक आस्थापनेकडून सिलबंद निविदा मागवित आहेत.

**अ) कार्यक्षेत्र**

1. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण कार्यालय व त्यांचे अधिपत्याखालील मुख्यालय परिसरातील सर्व शाखा, कार्यालये येत आहेत.
2. अपर पोलीस अधीक्षक पुणे विभाग व बारामती विभाग यांचे कार्यालय
3. उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालये - हवेली, खेड, बारामती, दौंड, लोणावळा, जुन्नर, भोर विभाग-सासवड व शिरुर उपविभाग.
4. पोलीस ठाणे - हवेली, वेल्हा, पौड, दौंड, यवत, शिरुर, शिक्रापुर, रांजणगाव MIDC, बारामती शहर, बारामती तालुका, भिगवण, वालचंदनगर, वडगाव निंबाळकर, इंदापूर, भोर, सासवड, जेजुरी, राजगड, जुन्नर, नारायणगाव, आळेफ़ाटा, ओतूर, खेड, मंचर, पारगांव (कारखाना), माळेगांव, घोडेगाव, लोणावळा शहर, लोणावळा ग्रामीण, वडगाव मावळ, कामशेत टाकवे (कार्यान्वित होण्याच्या प्रतिक्षेतील पो.ठाणे - सुपा, निरा-नृसिंहपूर)

ब)    **कराराची पार्श्वभुमी -**

CCTNS (Crime and Criminal Tracking Network & Systems) ह्या प्रणाली अंतर्गत महाराष्ट्र शासनाने सर्व प्रकारच्या तक्रारी online पध्दतीने घेण्यासाठी आणि गुन्ह्यांचे सर्व रेकॉर्ड ठेवण्यासाठी CCTNS प्रणाली विकसित केली आहे. सदर प्रणालीचा परिणामकारक वापर होण्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशनसाठी 04 संगणक व 02 प्रिंटर बसविण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे CCTNS प्रणाली अंतर्गत Software विकसित करण्यात आलेले आहे. सदर Software च्या मदतीने सर्व प्रकारच्या नोंदी संगणक प्रणालीमध्ये होतात. सदर Software हे Ubuntu या प्रणालीवर कार्यरत आहे. तसेच सदर Software हे Networking ने सर्व संगणकांना व प्रिंटरला जोडले आहे. CCTNS प्रणाली बंद असल्यास नवीन F.I.R. घेणे व गुन्ह्यांच्या संबंधित महत्वाची कामे करता येत नाहीत, त्यामुळे CCTNS प्रणाली सुरु / अविरत कार्यरत असणे खूप गरजेचे असते.

क)    **कामाची व्याप्ती (Scope of Work) -**

1. CCTNS प्रणाली अंतर्गत सर्व संगणक सुरळीत सुरु ठेवणे. त्याला योग्य ते Internet Connections सुरु आहे याची खात्री करणे. संगणकातील माहितीचा योग्य Backup सुरु ठेवणे. सर्व प्रकारचे Networking सुरु असल्याची खात्री करणे. VPN Server सह सर्व प्रणाली योग्य प्रकारे कार्यान्वित ठेवणे. CCTNS प्रणालीमध्ये असणारे प्रिंटर्स व स्कॅनर सुरु राहतील याची काळजी घेणे. सर्व प्रकारच्या Print Outs व्यवस्थित येत असल्याची खात्री करणे इत्यादी सर्व कामे तातडीने करार कालावधीमध्ये करावी लागतील.

   **CCTNS प्रणालीमध्ये खालील प्रकारचे Software & Hardware आहेत. -**

   1) Wipro Branded Desktop Intel Core i3 & AMD Processor
   2) Linux Ubuntu Operating System
   3) Brother HL 2250 Printer / Ricoh Aficio 3500
   4) Brother MFC 8370 DN Printer / Ricoh Aficio 325 SF

2. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण कार्यालय व त्यांचे आस्थापनेवर असणारे सर्व विभाग, सर्व पोलीस स्टेशन, सर्व उपविभागीय कार्यालये, अपर पोलीस अधीक्षक कार्यालये यांचे कडील सीसीटीएनएस प्रणालीसाठी वापरण्यात येणारे संगणक व प्रिंटर्स यांचे वार्षिक देखभाल व दुरुस्तीचे काम त्या-त्या ठिकाणी स्वखर्चाने जाऊन करावे लागेल. त्यासाठी जाणे-येणेचा खर्च स्वतंत्रपणे देण्यात येणार नाही. (शाखा, पोलीस स्टेशन व उपविभागीय कार्यालयाची नांवे सोबत संलग्न केलेली आहेत).
3. **सेवा संविदा कराराचा प्रकार** :- पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण कार्यालय व त्यांचे अधिपत्याखालील सर्व कार्यालये व पोलीस स्टेशनमधील CCTNS प्रणालीमधील संगणक, प्रिंटर व नेटवर्कींग साहित्य इत्यादीचे सुट्टे भागासह (Comprehensive AMC) सर्व समावेशक वार्षिक देखभाल / दुरुस्ती करार राहील.
4. **सर्व समावेश देखभाल दुरुस्ती करारानुसार सुट्टे भागासह सर्व साहित्याची देखभाल / दुरुस्ती करुन संगणक प्रणाली संबधित पोलीस स्टेशन व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालये यांच्या जिल्ह्यामधील सर्व ठिकाणी समक्ष जाऊन उत्तम स्थितीत कार्यरत ठेवणे बंधनकारक राहील.**

5. पुणे ग्रामीण पोलीस विभागाचे अखत्यारीतील CCTNS संगणक नेटवर्कींग (Lan) साहीत्य उदा. मॉडेम, राऊटर, लॅन केबल चांगल्या स्थितीत ठेवून नेटवर्क सुस्थितीत कार्यरत ठेवणे.
6. **सर्व समावेशक देखभाल / दुरुस्ती वार्षिक करार (Comprehensive AMC)** :- या करार अंतर्गत सर्व संगणक / प्रिंटर व सर्व IT Assets यांचे प्रतिबंधात्मक व सुधारात्मक देखभाल या दोन्हीचा समावेश असेल. सर्व समावेशक देखभाल / दुरुस्ती वार्षिक करार अंतर्गत सर्व IT Assets चा नादुरुस्त / सदोष भाग कोणताही अतिरिक्त खर्च न देता ठेकेदार यांनी निविदा कालावधीत बदलणे बंधनकारक राहील.
7. **Preventive Maintenance (प्रतिबंधात्मक देखभाल)**:- निविदा धारकास प्रतिबंधात्मक देखभाल करणे बंधनकारक असेल. प्रतिबंधात्मक देखभालीमध्ये हार्डवेअरशी संबंधित सर्व कामे, हार्डडिस्कची तपासणी, कंट्रोलर्स, SMPS, ड्रायव्हरर्सचे अद्यावतीकरण पॅचेस, सॉफ्टवेअर यांचे देखभाल करणे समाविष्ट असेल.
8. **Corrective Maintenance (सुधारात्मक देखभाल)**:- सुधारात्मक देखभाल म्हणजे समस्या ओळखणे व त्यांचे निराकरण करणे, ज्यामध्ये ऑपरेटींग सिस्टम स्थापित करणे / पुर्नस्थापित करणे, प्रिंटरचे सेटअप/ कॉन्फिगर करणे, ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर पुर्नस्थापित करणे, अँटी व्हायरस, आयटी मालमत्तेचे पुनरावलोकन, डिस्प्ले स्क्रीन चालवणे / देखभाल करणे समाविष्ट असेल.
9. **मूळ सुट्टे भाग बदलणेविषयी** :- संगणक, प्रिंटर इ. सहसामुग्रीचे नादुरुस्त झालेले मुळ सुट्टे भाग बदलताना यंत्रसामुग्रीचे मूळ उत्पादकाकडील सुट्टे भाग वापरणे बंधनकारक राहील. जर यंत्रसामुग्रीचे मूळ उत्पादक कंपनीचे (OEM)चे मेक ऐवजी दुसरे सुट्टेभाग वापरण्यात आल्यास अशा परिस्थितीत वार्षिक सेवा संविदा करार संपुष्टात येईल व सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्यात येईल.
10. **उशीराने केलेल्या कामाची भरपाई रक्कम** :- पोलीस अधीक्षक कार्यालय व पोलीस मुख्यालय आवारातील शाखा कार्यालयांकडून नादुरुस्त संगणक सहसामुग्रीचे दुरुस्ती बाबत कळविले नंतर वेळेचे आत उदा. 24 तासांचे आत दुरुस्तीसाठी हजर न झाल्यास वार्षिक सेवा संविदा कराराच्या प्रती दिवसाचे रक्कमेच्या 0.5% एवढी रक्कम भरपाई म्हणून वसूल करण्यात येईल. जी एका प्रकरणी जास्तीत जास्त एकूण वार्षिक सेवा संविदा कराराच्या 5% एवढी राहील. तसेच पोलीस ठाणे व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालये हे तालुका स्तरावर असलेमुळे त्याठिकाणी दुरुस्ती बाबत कळविल्यास 24 ते 48 तासात हजर होणे गरजेचे आहे अन्यथा त्यापुढील प्रत्येक दिवस / 24 तासांसाठी ₹ 1,000/- दंड आकारण्यात येईल तसेच वारंवार उशीर केल्यास करार रद्द करण्यात येईल.
11. संगणक प्रिंटर स्कॅनर इ. संबंधात दुरुस्तीस वेळ लागणार असल्यास 24 तासांचे आत आपाती (दुसरा तात्पुरता) संगणक, प्रिंटर, स्कॅनर पुरवून 48 तासांचे आत (कार्यालयीन वेळेत) समस्या दूर करावी.

12. संगणकात योग्य ऑपरेटींग सिस्टीम व इतर आवश्यक सॉफ्टवेअर लोड आहे किंवा नाही याची खात्री करणे याबाबतची जबाबदारी निविदा धारकाची राहील. सदर सेवा संविदा काळामध्ये संगणकामध्ये अद्यावत सॉफ्टवेअर गरजेनुसार लोड करणे व सॉफ्टवेअर बाबत काही तक्रार आल्यास त्याचे सुध्दा निवारण संबधित संगणक ज्या ठिकाणी आहे, त्याठिकाणी जिल्हाभर जाऊन तात्काळ करावे लागेल त्यासाठी कोणताही अतिरिक्त मोबदला देण्यात येणार नाही.
13. एखाद्या परिस्थितीत मूळ सुट्टा भाग उपलब्ध न झाल्यास सेवाकरार धारक CCTNS शाखा, पुणे ग्रामीण यांचेशी संपर्क साधून सदर सुट्टया भागाच्या बरोबरीचा अथवा त्यापेक्षा चांगल्या क्षमतेचा भाग वापरुन दुरुस्ती करेल. उदा. 500 ज़ीबी हार्ड डीस्क उपलब्ध नसेल तर 1 टिबी विनामोबदला बदलून द्यावी लागेल.
14. (Non-Comprehensive) निविदा वार्षिक सेवा संविदा कराराचे वेळी विचारात घेतल्या जाणार नाहीत.
15. निविदा धारकास कोणत्याही वेळेस दुरुस्तीचे वेळी सुट्टे पार्ट बदलण्याचे झाल्यास दुरुस्तीकरीता वेळोवेळी सर्वसाधारणत: लागणाऱ्या आवश्यक त्या साहित्याचा पुरेसा साठा कायमस्वरुपी ठेवावा लागेल.
16. **निवासी अभियंता पुरविणेबाबत:-** वार्षिक सेवा संविदा करार धारकास करार कालावधीमध्ये पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये एकूण 01 संगणक तज्ञ (Computer Engineer) पूर्ण वेळ अर्थात निवासी अभियंता (Residential Engineer) आणि पोलीस स्टेशनसाठी 01 संगणक तज्ञ असे 02 संगणक तज्ञ पूर्ण वेळ पुरवावे लागतील. सदर संगणक तज्ञ पोलीस अधीक्षक कार्यालयात पूर्ण दिवस हजर ठेवणे बंधनकारक असेल. निवासी अभियंता हा मुख्यालयातील संगणक व प्रिंटरची दुरुस्ती करेल आणि पोलीस अधीक्षक कार्यालयातील CCTNS विभागात कार्यरत असेल तसेच पोलीस ठाणे मधील संगणक व प्रिंटर बंद पडल्यास त्यासाठी नेमण्यात आलेला दुसरा संगणक अभियंता त्याठिकाणी जाऊन दुरुस्ती करेल. पोलीस ठाणे मधील सर्व्हर, संगणक बंद पडले व FIR निघत नसेल त्यावेळी कार्यालयीन दिवस व वेळ सोडून **24 तास 365 दिवस सेवा पुरवावी लागेल. सदर निवासी अभियंत्यास CCTNS प्रणालीसह Ubuntu या Operating System चे पूर्ण ज्ञान आवश्यक आहे. त्याच बरोबर VPN द्वारे Networking & Internet Sharing चे ज्ञान आवश्यक आहे.** आवश्यकता असल्यास निवासी अभियंता हे पोलीस ठाणे येथे जाऊन दुरुस्ती / देखभाल करतील.
17. निविदा मिळविणाऱ्या आस्थापनेला या घटकाचे अधिनस्त पोलीस स्टेशन, शाखा, उपविभागीय पोलीस अधिकारी व अपर पोलीस अधीक्षक कार्यालयातील सीसीटीएनएस प्रणालीतील सर्व संगणक, प्रिंटर हे करार करण्यात आले दिनांकापासून 01 महिन्याचे आंत दुरुस्त व देखभाल करुन यंत्रणा सुरळीत सुरु असलेबाबतचा अहवाल सीसीटीएनएस शाखेस देणे बंधनकारक राहील.

18. सर्व समावेशक देखभाल करार (Comprehensive AMC) अंतर्गत प्राप्त होणारी मागील महिन्याचे खर्चाची देयके ही पुढील महिन्याच्या 5 तारखेपर्यंत सीसीटीएनएस शाखा प्रमुखाकडून प्रमाणित करुन, नोडल ऑफिसर अपर पोलीस अधीक्षक, पुणे विभाग यांचे स्वाक्षरीने मंजूरीकरीता सादर करणे आवश्यक राहील.
19. **संगणक, प्रिंटरची दुरुस्ती ही पोलीस स्टेशन / कार्यालयातच करावी लागेल. CCTNS चे संगणक कधीही Format करावयाचे नाहीत. आवश्यकता भासल्यास CCTNS POLICE SPOC यांचेशी संपर्क साधून डाटा बॅकअप घेतल्याची खात्री करुनच Format करण्यात यावा, दुरुस्ती नंतर सर्व यंत्रणा पुनश्च Restore करणे आवश्यक राहील. अपवादात्मक परिस्थितीत CCTNS चे संगणक, प्रिंटर हे बाहेर नेण्याची आवश्यकता असल्यास सीसीटीएनएस नोडल ऑफिसर यांची परवानगी घेणे बंधनकारक राहील. नोडल ऑफिसरने अनुमती प्रदान केल्यास संगणक, प्रिंटर बाहेर नेल्यावर जास्तीत जास्त 02 दिवसात दुरुस्त करुन परत द्यावी लागेल. आणि कोणते पार्ट खराब झाले होते, त्याऐवजी नवीन पार्ट बसविलेनंतर हार्डवेअर रिप्लेसमेंट मध्ये नोंद घेऊन, त्याबाबतचा अहवाल दरमहा सीसीटीएनएस शाखेस सादर करणे बंधनकारक राहील.**
20. निविदाधारक यांनी सीसीटीएनएस चे सर्व IT Assets ची Inventory Register व Maintenance register ठेवणे बंधनकारक राहील.

**Inventory / Movement Register**

| Sr.No. | Inventary number | Make & Model of computer | Sr.No. | Movement | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Taken for repairs | | Returned after repairs | |
| | | | | Date | Time | Date | Time |
| 1 | | | | | | | |

**Maintenance register (उदा.)**

| Sr.No. | Inventory number | Date of Preventive maintenance | Date of Corrective maintenance | Name of Engineer | Spare parts used. | Nature of fault |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | SPPNR-01 | ----- | | | Nil | |
| 2 | SPPNR-02 | | ----- | | RAM 2FB-Intex | Found RAM Defective Replace the same. |

ड) **कराराच्या मुख्य अटी व शर्ती -**

1. कराराचा कालावधी हा 01 वर्षाचा राहील. समाधानकारक सेवा न दिल्यास करार कालावधीमध्ये सदर करार केंव्हाही रद्द करण्याचा अधिकार पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी राखून ठेवला आहे.
2. पुणे ग्रामीण पोलीस हे कायदा व सुव्यवस्था राखण्याचे अत्यंत महत्वाचे काम करीत असल्यामुळे अचानक पणे बऱ्याच वस्तूंची गरज भासते. त्याचबरोबर तातडीने सेवा मिळणे व अतिरीक्त मनुष्यबळाची आवश्यकता लागू शकते. त्यामुळे निविदाकार आस्थापना ही महाराष्ट्र राज्यात नोंदणीकृत असावा व त्याचे कार्यालय हे पुणे / पिंपरी चिंचवड महानगर व जिल्हा क्षेत्रामध्ये असणे, बंधनकारक राहील.

3. पुणे ग्रामीण पोलीस आस्थापनेवर असलेले CCTNS प्रणालीचे सर्व संगणक व प्रिंटर्स आहे तसे आणि आहे तिथे या प्रमाणेच दुरुस्त करावे लागतील. त्यासाठी जाण्या येण्याचे व इतर कुठल्याही प्रकारचे खर्च पुणे ग्रामीण पोलीस यांचे तर्फे देण्यात येणार नाही. (सर्व पोलीस स्टेशन व उपविभागीय कार्यालय, अपर पोलीस अधीक्षक कार्यालय यांची नावे व संगणक व प्रिंटर्स ची संख्या सोबत परिशिष्ट क्रमांक 1 मध्ये जोडली आहे.
4. निविदा मिळविणा-या संस्थेने दर महीन्याला 15 तारखेच्या आत सर्व पोलीस स्टेशन आणि उपविभागीय कार्यालये यांना भेटी देऊन तेथील संगणक व प्रिंटर्स प्रतिबंधात्मक देखभाल / दुरुस्ती (Preventive Maintenance) करुन अहवाल CCTNS शाखेस सादर करावा.
5. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षकांच्या आस्थापनेवर असलेले कोणत्याही शाखा, पोलीस ठाणे, उपविभागीय पोलीस अधीकारी, अपर पोलीस अधीक्षक कार्यालये, यामधून कितीही वेळेस तक्रार प्राप्त झालेस निविदाकारास तेथे Service Engineer यांना योग्य त्या स्पेअर पार्टसह 24 तासांचे आत रवाना करावा लागेल.
6. या कार्यालयास न्यूनतम दराची निविदा मान्य करण्याचे बंधन असणार नाही. कार्यालयाच्या कामकाजाच्या हितासाठी अन्य यथोचित निविदा मंजूर करण्याचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.
7. निविदेमधील सर्व काम हे या कार्यालयाच्या कामकाजाच्या हितासाठी एकाच पात्र निविदाधारकास निविदेमधील न्यूनतम दराने व एकवट पध्दतीने देण्यात येईल. असे करताना पूर्वानुभव व गुणवत्ता यांना प्राधान्य देण्यात येईल. तसेच कामाचे तुकडे करुन काम वेगवेगळ्या निविदाकारांना देण्यात येणार नाही.
8. **दुरुस्ती व देखभाली बाबत** :- दुरुस्ती करिता केव्हाही व कितीही वेळा दूरध्वनीवरुन बोलावले /कळविले नंतर चोवीस (24) तासांचे आंत दुरुस्तीचे ठिकाणी जाऊन दुरुस्ती करुन द्यावी लागेल. सर्व प्रकारच्या संगणक सहसामुग्रीचे नादुरुस्त झालेले सुट्टे भाग देखभाल कराराचे खर्चात दुरुस्ती / बदलून द्यावे लागतील. उदा. प्लास्टीकचे भाग, प्रिंटर बेल्ट, प्रिंटर सॉकेट, स्कॅनर लॅम्प, लॉजीक कार्ड, प्रिंट हेड ट्रे, डेसी व्हील, रोलर, ट्रॅ अॅन्ड डोअर, ट्रान्सपरसी फिल्म, सिल्ड मॅग्नेटीक मेडीया प्लास्टीक कव्हर, नॉब ट्रॅक्टर, रॉड हार्डडिस्क, फ्युजर असेम्ब्ली, प्रिंट नॉब, ऑनलाईन बटन गिअर, सीपीयु, मदरबोर्ड FDD, DVD, HDD, RAM, SMPS, मॉनिटर पिक्चर टयूब इत्यादी.
9. **मूळ सुट्टे भाग बदलणेविषयी** :- संगणक, प्रिंटर इ. सहसामुग्रीचे नादुरुस्त झालेले मूळ सुट्टे भाग बदलताना यंत्रसामुग्रीचे मुळ उत्पादकाकडील सुट्टे भाग वापरणे बंधनकारक राहील. जर यंत्रसामुग्रीचे मूळ उत्पादक कंपनीचे (OEM)चे मेक ऐवजी दुसरे सुट्टेभाग वापरण्यात आल्यास अशा परिस्थितीत वार्षिक सेवा संविदा करार संपुष्टात येईल व सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्यात येईल.
10. **उशीराने केलेल्या कामाची भरपाई रक्कम** :- पोलीस अधीक्षक कार्यालय व पोलीस मुख्यालय आवारातील शाखा कार्यालयांकडून नादुरुस्त संगणक सहसामुग्रीचे दुरुस्ती बाबत कळविले नंतर वेळेचे आत उदा. 24 तासांचे आत दुरुस्तीसाठी हजर न झाल्यास वार्षिक सेवा संविदा कराराच्या प्रती दिवसाचे रक्कमेच्या 0.5% एवढी रक्कम भरपाई म्हणून वसूल करण्यात येईल. जी एका प्रकरणी जास्तीत जास्त एकूण वार्षिक सेवा संविदा कराराच्या 5% एवढी राहील. तसेच पोलीस ठाणे व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालये हे तालुका स्तरावर असलेमुळे त्याठिकाणी दुरुस्ती बाबत कळविल्यास 24 ते 48 तासात हजर होणे गरजेचे आहे अन्यथा त्यापुढील प्रत्येक दिवस / 24 तासांसाठी ₹ 1,000/- दंड आकारण्यात येईल तसेच वारंवार उशीर केल्यास करार रद्द करण्यात येईल.

11. मंजूर निविदाकार कंपनीस कार्यालयाच्या कामाच्या गरजेनुसार बदली संगणक / प्रिंटर्स (Standby) निविदा मंजूर झाल्या बरोबर CCTNS शाखेत द्यावे लागतील. त्याची संख्या खालील प्रमाणे राहील -
    a. संगणक - 05 नग
    b. मॉनिटर - 05 नग
    c. प्रिंटर टोनर सह - 04 नग (Single function -2 nos. Multi function -2 Nos.)
    d. मोडेम BSNL करीता - 02 नग
    e. टोनर - 04 नग (Single function - 2 nos. Multi function - 2 Nos.)
12. मंजूर निविदाकारास **मंजूर निविदा रकमेच्या** 5% अनामत रक्कम म्हणून धनाकर्षाने (Demand Draft) किंवा बॅक गॅरंटी म्हणून कराराच्या तारखेपासून 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल. त्यापुढील प्रत्येक दिवसासाठी रु. 500/- प्रमाणे आर्थिक दंड (विनापरतावा) आकारण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.
13. **या निविदेतील कोणतीही अट रद्द करण्याचा / शिथील करण्याचा किंवा संपूर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अथवा पुढे ढकलण्याचा संपूर्ण अधिकार मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी राखून ठेवला आहे.**
14. पोलीस ठाण्यांची किंवा उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयांची संख्या वाढल्यास अगर कमी झाल्यास (पोलीस ठाणे शहर हद्दीमध्ये वर्ग झालेनंतर किंवा इतर कोणत्याही कारणास्तव) एक नग संगणक किंवा एक नग Single Function printer किंवा एक नग multifunction printer बाबत निविदेमध्ये नमूद करण्यात आलेल्या रक्कमेच्या प्रमाणानुसार देयकामध्ये बदल करता येतील. असे बदल ह्या कार्यालयाकडून शुद्धीपत्राद्वारे कळविण्यात आलेनंतर अधिकृत समजण्यात येतील.
15. असे संगणक किंवा Single Function printer किंवा multifunction printer महिन्याच्या 1 ते 15 तारखेपर्यंत कमी / अधिक झाल्यास त्याचे देयक संबंधित महिन्यामध्ये आकारता येणार नाही. तसेच महिन्याच्या 16 ते 31 (महिन्याची शेवटची तारीख) तारखेनंतर कमी / अधिक झाल्यास त्याचे देयक संबंधित महिन्यात आकारता येईल.
16. यशस्वी निविदाकार यांना निविदा कालावधी समाप्तीपुर्वी सर्व संगणक साहित्य / प्रिंटर्स सुस्थितीत असलेबाबतचा संबंधित शाखा प्रमुख, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, उपविभागीय पोलीस अधीकारी, अपर पोलीस अधीक्षक यांचेकडील अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

**इ) निविदा दाखल करण्याची पध्दत -**

1. सदर निविदा ही online पध्दतीने e-tender द्वारा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर 02 लिफाफा पध्दतीने भराव्यात. तसेच सदर निविदा www.puneruralpolice.gov.in या वेब पोर्टल वर **फक्त download करण्यासाठी** उपलब्ध आहे. सदर निविदा ₹ 3400/- (विना परतावा) चा भरणा online करुन download कराव्यात. ₹ 3400/- चा भरणा न करता भरलेल्या निविदा पात्र ठरणार नाहीत.
2. **लिफ़ाफ़ा क्रं. 1 मध्ये तांत्रिक** माहीती खालील प्रमाणे देण्यात यावी -

**निविदा कारांनी सोबत जोडायची कागदपत्रे**

a. निविदाकार कंपनीचे पूर्ण नाव व पत्ता दूरध्वनीसह
b. निविदाकार कंपनीचे मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे पूर्ण नाव व पत्ते दूरध्वनीसह
c. निविदाकार कंपनीचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (Company incorporation / Shop Act)
d. निविदाकार कंपनीचे / मालकाचे PAN Card / TAN Card.
e. निविदाकार कंपनीचे मागील 03 वर्षांचे Income Tax Return.

f. निविदाकार कंपनीचे GST Registration Certificate.

g. संगणक व प्रिंटर्स च्या वार्षिक देखभाल व दुरुस्तीचे शासकीय व निमशासकीय /खाजगी संस्थेमधील किमान कामाचा **02** वर्षाचा अनुभव आवश्यक त्या कागदपत्रांसह. (सोबत work order / Purchase Order जोडणे बंधनकारक)

h. निविदाकार कंपनीचे एकूण Technical Manpower संबंधी माहिती सादर करणे बंधनकारक आहे. (किमान 05 Technical कामगार असलेबाबत)

i. निविदाकार कंपनी किंवा त्यांचे मालक / संचालक / भागीदार व त्यांचे जवळचे नातेवाईक यांच्यावर कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी कार्यालयामध्ये फ़सवणुकीची / गैरप्रकाराची किंवा भ्रष्टाचाराची कोणतीही चौकशी चालू / प्रलंबित नसली पाहिजे. तसेच निविदाकार कंपनीचा समावेश सरकारी काळ्या यादीत नसला पाहिजे. अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र ₹ 100/- च्या स्टॅम्प पेपर वर देणे बंधनकारक आहे. **(सोबत नमुना परिशिष्ट - 02)**

j. निविदाकार कंपनीचे मालक / संचालक / भागीदार व त्यांचे जवळचे नातेवाईक उदा. आई, वडील, भाऊ, बहीण, पत्नी, पती, मुलगा, मुलगी यांच्या नावावर दोन किंवा जास्त समान व्यवसाय करणाऱ्या स्वतंत्र अथवा भागीदारीमध्ये वेग वेगळ्या कंपन्या रजिस्टर / नोंदणीकृत असल्यास सदर कंपनी व मूळ कंपनी अशा दोन किंवा जास्त निविदा सादर करता येणार नाहीत. तसेच अशा प्रकारच्या दोन किंवा जास्त निविदा एकाच वेळी व एकाच निविदेसाठी इतर कोणत्याही शासकीय कार्यालयात सादर केल्या असतील व तसे करुन मूळ कंपनीच्या नावावर काम घेतले असेल किंवा नसेल, अशा कंपन्यांना साखळी करुन (Ring) निविदा प्रक्रिया केली, असे संबोधले जाईल व अशा कंपन्यांच्या निविदा रद्द करण्यात येतील. निविदा सादर करणाऱ्या सर्व निविदाकारांनी स्वतःचे प्रतिज्ञापत्र ₹ 100/- च्या मुद्रांकावर सोबत जोडलेल्या नमुन्या प्रमाणे देणे बंधन कारक आहे. (सोबत नमुना परिशिष्ट - 3)

k. निविदा बयाना रक्कम ₹ 17,000/- चा online भरणा केल्याची पावती (Transaction ID / Online Receipt) जोडणे बंधनकारक आहे. निविदा बयाना सूट लागू नाही.

3. **लिफ़ाफ़ा क्रं. 2 व्यावसायिक - सदर दर हे www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवरील देण्यात आलेल्या Bill Of Quantity (BOQ) या Excel Format मधील File मध्ये असले प्रमाणे भरण्यात यावेत.**
4. उपरोक्त नमूद केलेल्या पध्दतीने सादर न झालेल्या निविदा नाकारण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी.
5. निविदेतील प्रत्येक पान हे निविदाकार कंपनीने अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने स्वयंसाक्षांकित करणे आवश्यक राहील.
6. ज्या निविदाकाराची तांत्रिक निविदा छाननी / खरेदी समितीने मंजूर केलेली असेल त्यांचीच व्यावसायिक निविदा (दरपत्रक) उघडण्यात येईल.
7. निविदे संदर्भातील सर्व निर्णय मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण हे घेतील व ते सर्व निविदाकारांवर बंधनकारक असतील.
8. कोणतीही निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क तसेच कोणतेही कारण न देता सदर निविदा सूचना पुढे ढकलणे किंवा रद्द करणे याचे अधिकार मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण

यांनी राखून ठेवलेले आहेत. तसेच अशा मंजूर किंवा नामंजूर निविदे बाबत कोणतेही स्पष्टीकरण मा. पोलीस अधीक्षक हे इतर निविदाकारांना देणार नाहीत.

9. अपात्र निविदाकारांची बयाना रक्कम, सर्व प्रक्रिया पूर्ण झालेनंतर online पध्दतीने परत मिळेल.
10. निविदेमधील दर हे संपूर्ण करार कालावधीसाठी बंधनकारक असतील. कोणत्याही कारणाने त्यामध्ये वाढ देण्यात येणार नाही.

**वरील प्रकारचे CCTNS संगणक व प्रिंटर्स देखभाल व दुरुस्ती यांचे दर देताना सदर वस्तूची पाहणी निविदाकार कंपनीने स्वतःच्या खर्चाने या कार्यालयात येऊन किंवा संबंधित पोलीस स्टेशनला जाऊन करावी. ज्या निविदाकाराची तांत्रिक निविदा सर्व कागदपत्रांसह मंजुर होईल अशा निविदाकाराचीच व्यावसायिक निविदा उघडण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

**फ ) निविदा दाखल करणे / निविदा उघडणे याबाबतचा तपशील -**

| Sr.no. | Particulars | From Date / Time | To Date/Time |
|---|---|---|---|
| 1. | Publish date | 27/07/2023 11.00 Hrs. | - |
| 2. | Document Download | 27/07/2023 11.00 Hrs. | 08/08/2023 16.00 Hrs. |
| 3. | Pre Bid meeting | 01/08/2023 10.30 Hrs. | - |
| 4. | Bid Submission | 27/07/2023 11.00 Hrs. | 08/08/2023 16.00 Hrs. |
| 5. | Technical Bid Opening | 10/08/2023 11.00 Hrs. | - |
| 6. | Commercial Bid Opening | After Successful Technical Bid Opening | |
| 7. | Contact Person | Srhi. Shrish Mangave, - A.P.I. - Reader to Addl. Sp. Pune.<br>Office of the Superintendent Of Police, Pune, Rural. Chavan nagar, Pashan Road, Pune -411008. Mob. No. +91 9881268081. | |

▲ महत्वाची सूचना :- सदर कार्यालय कायदा व सुव्यवस्था राखण्याचे अत्यंत महत्वाचे काम करीत असल्यामुळे निविदा उघडणेची तारीख व वेळ कधीही बदल / रद्द / पुढे ढकलण्यात येवू शकते.

प्रस्तावित संगणक व प्रिंटर देखभाल व दुरुस्ती करारासंबंधी काही शंका असल्यास त्याच्या निराकरणासाठी पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालयात उपरोक्त नमुद केलेल्या संपर्क अधिकारी यांचेशी कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळेत (सकाळी 11.00 ते सायंकाळी 17.00 वा. पर्यंत ) संपर्क करावा. तसेच E-Tender विषयी काही शंका असल्यास एनआयसीच्या 180030702232 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

**ई-निविदा पध्दतीने निविदा भरताना काही अडचणी आल्यास (Internet सेवा बंद असणे / लाईट जाणे ई.) व त्यामुळे अपूर्ण निविदा भरली गेल्यास त्याला हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच अशा प्रकारच्या कोणत्याही समस्या निर्माण झाल्यास त्याची कोणतीही दखल घेतली जाणार नाही, याची सर्व निविदाकारांनी नोंद घ्यावी.**

**(अंकित गोयल)** भा.पो.से
**पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.**

## परिशिष्ट -अ

- निविदा दाखल करणे / निविदा उघडणे याबाबतचा तपशील :-

| Sr.no. | Particulars | From Date / Time | To Date/Time |
|---|---|---|---|
| 1. | Publish date | 27/07/2023 11.00 Hrs. | - |
| 2. | Document Download | 27/07/2023 11.00 Hrs. | 08/08/2023 16.00 Hrs. |
| 3. | **Pre Bid meeting** | **01/08/2023 11.00 Hrs.** | - |
| 4. | Bid Submission | 27/07/2023 11.00 Hrs. | 08/08/2023 16.00 Hrs. |
| 5. | Technical Bid Opening | 10/08/2023 11.00 Hrs. | - |
| 6. | Commercial Bid Opening | After Successful Technical Bid Opening | |
| 7. | Contact Person | Srhi. Shrish Mangave, - A.P.I. - Reader to Addl. Sp. Pune.<br>Office of the Superintendent Of Police, Pune, Rural. Chavan nagar, Pashan Road, Pune -411008. Mob. No. +91 9881268081. | |

▲ महत्वाची सूचना :- सदर कार्यालय कायदा व सुव्यवस्था राखण्याचे अत्यंत महत्वाचे काम करीत असल्यामुळे निविदा उघडणेची तारीख व वेळ कधीही बदल / रद्द / पुढे ढकलण्यात येवू शकते.

**(अंकित गोयल)** भा.पो.से
**पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.**

## परिशिष्ट -1

पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण कार्यालयाचे अधिनस्त शाखा, कार्यालये, पोलीस स्टेशन, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, अपर पोलीस अधीक्षक कार्यालये व तेथील संगणक साहित्य व प्रिंटरची यादी. त्यामध्ये वापरली जाणारी भाषा :- सीसीटीएनएस, Linux Ubuntu अशी आहे.
* **टिप** :- संगणक व प्रिंटर्स यांची सध्याची संख्या गृहीत धरलेली आहे. भविष्यात काही संगणक व प्रिंटर्स यांची संख्या कमी अथवा जास्त होऊ शकते.

### सन 2023

Pune Rual CCTNS 13 July 2023

| Sr. No. | Police Station / Higher Officer Name | Computer | | | Printer | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Total | Working | Non working | Total | BROTHER 8370 Multifunctional /Ricoh | | Lesar | |
| 1 | SP OFFICE | | | | | Working | Non working | Working | Non working |
| A | Sp Sir Office | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 0 |
| B | Sp Reader Office | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 0 |
| C | Adllsp pune Office | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| D | Adllsp Reader Office pune Office | 1 | 0 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 |
| E | Home Dysp Office | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 0 |
| F | LCB | 3 | 1 | 2 | 2 | 0 | 2 | 0 | 0 |
| G | DSB | 2 | 0 | 2 | 2 | 0 | 2 | 0 | 0 |
| H | Krushna Hall | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| I | DCTC (CCTNS) | 2 | 2 | 0 | 2 | 0 | 2 | 0 | 0 |
| J | Control Room | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 0 |
| | TOTAL SP OFFICE UNDER | 14 | 6 | 8 | 11 | 1 | 10 | 0 | 0 |
| | | | | | | | | | |
| 2 | Addl SP Baramati Office | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 1 | | |
| A | Addl SP Baramati Reader Off | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 0 |
| 1 | SDPO Lonavala | 3 | 1 | 2 | 1 | 0 | 1 | 0 | 0 |
| 2 | SDPO Haveli | 3 | 0 | 3 | 1 | 0 | 1 | 0 | 0 |
| 3 | SDPO Khed | 2 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 |
| 4 | SDPO Junnar | 3 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 |
| 5 | SDPO Baramati | 2 | 2 | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 |
| 6 | SDPO Daund | 3 | 1 | 2 | 1 | 0 | 1 | 0 | 0 |
| 7 | SDPO Bhor(Saswad) | 3 | 1 | 2 | 1 | 1 | 0 | 0 | 0 |
| 8 | SDPO Shirur | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

Pune Rual CCTNS 13 July 2023

| Sr. No. | Police Station / Higher Officer Name | Computer | | | Printer | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Total | Working | Non working | Total | BROTHER 8370 Multifunctional /Ricoh | | Lesar | |
| 1 | Baramati City | 4 | 3 | 1 | 2 | 1 | 0 | 0 | 1 |
| 2 | Bhor | 4 | 3 | 1 | 2 | 0 | 1 | 0 | 1 |
| 3 | Daund | 4 | 4 | 0 | 2 | 0 | 1 | 0 | 1 |
| 4 | Ghodegaon | 4 | 4 | 0 | 2 | 1 | 0 | 0 | 1 |
| 5 | Haveli | 4 | 3 | 1 | 2 | 1 | 0 | 0 | 1 |
| 6 | Indapur | 4 | 4 | 0 | 2 | 1 | 0 | 0 | 1 |
| 7 | Jejuri | 4 | 2 | 2 | 2 | 1 | 0 | 0 | 1 |
| 8 | Junnar | 4 | 2 | 2 | 2 | 1 | 0 | 0 | 1 |
| 9 | Khed | 4 | 2 | 2 | 2 | 1 | 0 | 0 | 1 |
| 10 | Lonavala City | 4 | 3 | 1 | 2 | 0 | 1 | 0 | 1 |
| 11 | Narayangaon | 4 | 2 | 2 | 2 | 1 | 0 | 0 | 1 |
| 12 | Paud | 4 | 2 | 2 | 2 | 0 | 1 | 0 | 1 |
| 13 | Saswad | 4 | 3 | 1 | 2 | 0 | 1 | 0 | 1 |
| 14 | Shirur | 4 | 3 | 1 | 2 | 1 | 0 | 0 | 1 |
| 15 | Vadgaon Maval | 5 | 3 | 1 | 2 | 1 | 1 | 1 | 1 |
| 16 | Vadgaon Nimbalkar | 4 | 2 | 2 | 2 | 0 | 1 | 0 | 1 |
| 17 | Velha | 4 | 2 | 2 | 2 | 0 | 1 | 0 | 1 |
| 18 | Baramati Taluka | 4 | 3 | 1 | 2 | 1 | 0 | 0 | 1 |
| 19 | Manchar | 4 | 2 | 2 | 2 | 1 | 0 | 0 | 1 |
| 20 | Yavat | 4 | 2 | 2 | 2 | 0 | 1 | 0 | 1 |
| 21 | Lonavala Rural | 4 | 3 | 1 | 2 | 1 | 0 | 0 | 1 |
| 22 | Walchand Nagar | 4 | 4 | 0 | 2 | 1 | 0 | 0 | 1 |
| 23 | Otur | 5 | 3 | 1 | 2 | 0 | 1 | 0 | 1 |
| 24 | Rajgad | 4 | 2 | 2 | 2 | 1 | 0 | 0 | 1 |
| 25 | Shikrapur | 4 | 2 | 2 | 2 | 1 | 0 | 0 | 1 |
| 26 | Bhigwan | 4 | 3 | 1 | 2 | 0 | 1 | 0 | 1 |
| 27 | Ranjangaon MIDC | 4 | 2 | 2 | 2 | 0 | 1 | 0 | 1 |
| 28 | Kamshet | 4 | 1 | 3 | 2 | 0 | 1 | 0 | 1 |
| 29 | Pargaon - 1 | 2 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 30 | Alefata | 4 | 3 | 1 | 2 | 1 | 0 | 1 | 0 |
| 31 | Malegaon - 1 | 2 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 32 | Cyber | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | 144 | 90 | 54 | 67 | 21 | 18 | 2 | 28 |
| | ALL TOTAL | 158 | 96 | 62 | 78 | 22 | 28 | 2 | 28 |

## परिशिष्ट -2

(मालकाचे / भागीदार / संचालक यांचे प्रतिज्ञापत्र)

**प्रतिज्ञापत्र (₹100 च्या मुद्रांकावर)**

मी / आम्ही ------------ (मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे नाव व पत्ता) --------------------------- पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये संगणक व प्रिंटर्स च्या सेवा संविदा कराराची निविदा---------------- (निविदाकार कंपनीचे नाव व पत्ता) ------------ नावाने भरत आहोत.

मी / आम्ही तसेच माझी कंपनी यांचे विरोधात कोणत्याही सरकारी कार्यालयामध्ये निविदा भरण्याच्या दिनांक रोजी पर्यंत कोणतीही गैरप्रकार, अफरातफर गैरव्यवहार, फसवणूक तसेच भ्रष्टाचार या विषयी कोणतीही चौकशी चालू नाही किंवा प्रलंबित नाही.

तसेच अशा प्रकारची कोणतीही चौकशी माझे / आमचे जवळचे नातेवाईक (आई / वडील / बायको / नवरा / भाऊ / बहीण) यांचे विरोधात सुध्दा चालू नाही.

**सही**

**निविदाकार कंपनीचे मालक / भागीदार / संचालक**

## परिशिष्ट - 3

(मालकाचे / भागीदार / संचालक यांचे प्रतिज्ञापत्र)

**प्रतिज्ञापत्र (₹ 100 च्या मुद्रांकावर)**

मी / आम्ही ------------ (मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे नाव व पत्ता) --------------------------- पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये संगणक व प्रिंटर्स च्या सेवा संविदा कराराची निविदा ---------------- (निविदाकार कंपनीचे नाव व पत्ता) ------------ नावाने भरत आहोत.

मी / आम्ही सदर कंपनीचे संचालक असून आमच्या संचालकांच्या जवळच्या नातेवाईक (मालक / संचालक व त्यांचे जवळचे नातेवाईक उदा. आई, वडील, भाऊ, बहीण, पत्नी, पती, मुलगा, मुलगी) यांच्या नावावर दोन किंवा जास्त समान व्यवसाय करणाऱ्या स्वतंत्र अथवा भागीदारीमध्ये वेग वेगळ्या कंपन्या रजिस्टर आहेत / नाहीत. (असल्यास त्यांची नावे देण्यात यावीत.)

तसेच सदर दोन किंवा त्यापेक्षा जास्त असणाऱ्या कंपन्यांनी मिळून कोणत्याही एका शासकिय निविदा प्रक्रियेमध्ये एकत्र सहभाग नोंदविलेला नाही. तसेच अशा प्रकारचे कोणतेही शासकीय काम घेतलेले नाही. अशा प्रकारची तक्रार आढळून आल्यास मला व माझ्या कंपनीला सदर निविदा प्रक्रियेमधून रद्द करण्यात येईल, याची मला जाणीव आहे.

**सही**

**निविदाकार कंपनीचे मालक / भागीदार / संचालक**

**लखोटा क्रं. 1 (तांत्रिक) उघडण्याबाबत -**

लखोटा क्रं. 1 (तांत्रिक) हा दिनांक 01/12/2016 च्या उद्योग व उर्जा विभागाकडील शासन निर्णयातील (2.9.4) सुचनेनुसार गठीत केलेल्या समितीसमोर E-Tender प्रणाली मार्फ़त उघडण्यात येईल. तसेच त्यासाठी निविदाकारांना आमंत्रित केले जाईल. निविदाकार स्वतः किंवा त्यांचे प्रतिनिधी (प्राधिकारपत्रासह) सदर वेळी उपस्थित राहू शकतात. जे निविदाकार उपस्थित राहणार नाहीत त्यांना सदर प्रक्रियेमध्ये कोणतीही तक्रार करता येणार नाही. तसेच लखोटा क्रं 1 (तांत्रिक) मधील सर्व कागदपत्रांची तपासणी समितीमार्फ़त केली जाईल. त्यासाठी गरज लागल्यास जास्त वेळ मागून घेण्यात येईल. कागदपत्रांची तपासणी निविदाकारांसमोरच करण्याचे बंधन समितीवर नसेल. समितीच्या वेळेनुसार व गरजेनुसार कागदपत्रांची छाननी व तपासणी केली जाईल. तसेच त्याबाबतीत अंतिम निर्णय हे मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण हे समिती चे अध्यक्ष या नात्याने घेतील व तो निर्णय सर्वांवर बंधनकारक असेल. समितीचा निर्णय यथावकाश सर्व निविदा धारकांना कळविण्यात येईल.

**निविदेचा वैधता कालावधी -**

निविदेचा वैधता कालावधी तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर किमान 120 दिवस असेल. 120 दिवसांपेक्षा कमी कालावधी दर्शविलेल्या निविदा नाकारण्यात येतील. तसेच सदर निविदा किमान एक वर्षांसाठी बंधनकारक असतील.

**निविदा प्रक्रियेबाबत अथवा निविदा सादर केलेल्या निविदाधारकांबाबत तक्रारीबाबत -**

निविदा प्रक्रियेमध्ये निविदा सादर केलेल्या निविदाधारकावर तक्रार दाखल करणा-या तक्रारधारकास ₹ 50,000/- इतकी अनामत रक्कम कार्यालयाकडे जमा करावी लागेल. जर तक्रारीमध्ये तथ्य आढळल्यास संबंधित तक्रारदाराची अनामत रक्कम परत करुन आरोप सिध्द झालेल्या निविदाधारकास निविदा प्रक्रियेमधून वगळण्यात येऊन त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. (महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग कडील शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 01/12/2016 मधील 5.7.2 नुसार)

त्याचप्रमाणे निविदा प्रक्रियेविषयी काही आक्षेप / तक्रार असल्यास फक्त निविदा सादर केलेल्या निविदाकारास (त्याने अनामत रक्कम भरली असल्यास) तक्रार करण्याचा अधिकार असेल. त्यासाठी सुध्दा संबधित तक्रारदाराने ₹ 50,000/- इतकी अनामत रक्कम कार्यालयाकडे जमा करावी लागेल.

**निविदेचे मुल्यमापन -**

1. गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फ़त तांत्रिक लखोट्यातील कागदपत्रांची तपासणी केली जाईल. निविदाधारकाचे पात्रतेचे सर्व निकष, निविदाधारकाची ऐपत, निविदा कालावधी पूर्ण करण्याची क्षमता याबाबतची छाननी निविदा धारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे समिती ठरवेल.
2. तांत्रिक निविदेचे मूल्यमापन करताना, निविदाकारांना त्यांनी नमूद केलेल्या तांत्रिक कर्मचारी यांच्या पैकी एका कर्मचाऱ्याकडून CCTNS प्रणालीसाठी लागणाऱ्या Ubuntu या Operating System चे व CCTNS प्रणालीचे ज्ञान असलेबाबत Demo द्यावा लागेल. सदर Demo व्यवस्थित दिल्यास तांत्रिक निविदा मान्य करण्यात येईल, ही या करारामधील प्रमुख मूल्यमापन अट आहे.

3. कामकाजाच्या सोयीसाठी सर्व काम एकाच निविदाकाराला एकवट पध्दतीने व न्यूनतम दर तसेच निविदाधारकाची ऐपत, निविदा कालावधी पूर्ण करण्याची क्षमता, पूर्वानुभव आदी बाबींचा विचार करुन दिले जाईल. त्यासंदर्भात निर्णय घेण्याचे सर्व अधिकार मा. पोलीस अधीक्षक यांनी राखून ठेवले आहेत.
4. **सदर निविदा ही BOQ पध्दतीने भरण्यात येणार आहेत. त्यामुळे निविदेमधील प्रत्येक घटकाचे (Item wise) स्वतंत्र मूल्यमापन न करता BoQ मधील एकूण रक्कम (Final Total) नुसार मूल्यमापन केले जाईल.**

**भ्रष्ट, फसवणूक अथवा अव्यवहार्य सेवेबाबत -**

भ्रष्ट, फसवणूक अथवा अव्यवहार्य सेवा असणाऱ्या तसेच उपरोक्त असलेले व सदरची माहीती या कार्यालयापासून लपवून ठेवलेल्याचे निदर्शनास आलेस सदर निविदाकाराची निविदा कोणत्याही स्तरावर रद्द करण्यात येईल.

**निविदा प्रक्रियेबाबतचे स्पष्टीकरण -**

निविदा प्रक्रियेबाबत काही शंका अथवा तक्रारी असल्यास संबंधित निविदाकाराने अथवा निविदा भरु इच्छिणाऱ्या निविदाकारांनी सदरची शंका अथवा तक्रार निविदा भरण्याच्या अंतिम दिनांक व वेळेपूर्वी किमान 02 दिवस अगोदर लेखी स्वरुपात या कार्यालयाला सादर करावी. त्यानंतर आलेल्या कोणत्याही शंका अथवा तक्रारींची दखल घेतली जाणार नाही.

**निविदेमध्ये दर भरण्याविषयी -**

निविदा प्रक्रियेत सहभागी होऊ ईच्छिणा-या निविदाकारांनी निविदेतील दर भरण्यापुर्वी या कार्यालयामध्ये येऊन किंवा संबधित पोलीस स्टेशनला जाऊन वापरण्यात येणारे संगणक व प्रिंटर्स त्यांचा make, model इत्यादी बाबींची खात्री समक्ष करावी. तसेच दर भरण्याविषयी काही शंका असल्यास महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग कडील शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 01/12/2016 मधील 4.4.1.1 चे परिशिष्ट क्र. 6 मधील नमुन्याप्रमाणे निविदा पूर्व बैठकीमध्ये ती मांडावी. निविदा पूर्व बैठकीस उपस्थित नसणा-या निविदाकारांस निविदेविषयी कोणतीही तक्रार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**(अंकित गोयल)** भा.पो.से
**पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.**